# ६० औषधी वनस्पती उजेडात

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठात देशातील पहिली लीड बोटॅनिकल गार्डन बनवण्याची संधी शिवाजी विद्यापीठाला मिळाली आणि गेल्या दोन ते अडीच वर्षांत जगभरातील दुर्मीळ वनस्पती व त्यांच्या उपयुक्ततेबाबत संशोधनाला चालना मिळाली आहे. दोन वर्षांत वनस्पतीशास्त्रात संशोधन करणाऱ्या विद्यार्थी व संशोधकांनी दिलेल्या अभ्यासभेटीतून या गार्डनचा हेतू साध्य झाला. या गार्डनमधील संशोधनातून आजवर ६० औषधी वनस्पतींचा शोध लागला आहे.

देशातील अन्य विद्यापीठाकडून केंद्र सरकारने या लीड बोटॅनिकल गार्डनसाठी प्रस्ताव मागविले होते. यात शिवाजी विद्यापीठाने बाजी मारली. केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडून २००७ मध्ये पश्चिम भारतातील पहिली लीड बोटॅनिकल गार्डन म्हणून विद्यापीठाच्या वनस्तपतीशास्त्र विभागातील उद्यानास मान्यता मिळाली. केंद्रीय मंत्रालयाकडून सुमारे अडीच कोटी रुपयांसह अन्य सरकारी संस्थांकडून एकूण सुमारे ५ कोटी रुपयांच्या निधीतून बॉटेनिकल गार्डनची उभारणी झाली. सुमारे ६ एकर जागेत हे गार्डन विस्तारले आहे. देश आणि परदेशातील अनेक दुर्मीळ



## बोटॅनिकल गार्डनमुळे वाढला संशोधनाचा टक्का



प्रजातीचे जतन, संगोपन आणि संवर्धन केले आहे.

बोटॅनिकल गार्डनमध्ये २००० प्रदेशनिष्ठ प्रजातींचे जतन पश्चिम घाटांतील स्थानिक वनस्पतींच्या सुमारे २ हजार प्रदेशनिष्ठ प्रजाती आहेत. यात दुर्मिळ आणि लुप्त होत चाललेल्या वनस्पती आहेत. गेल्या दहा वर्षांत पाम, ताड, माड याच्या देशभरातील सुमारे १०० हून अधिक प्रजातीच्या बिया आणून लागवड केली. यातील



> बोटॅनिकल गार्डनला दर महिन्याला दोन हजार विद्यार्थी, संशोधक भेट देतात. या गार्डनमधील दुर्मीळ वनस्पतीचा अभ्यास करून विभागाने ६० प्रकारच्या नवीन औषधी वनस्पतीचा शोध लावला आहे. तसेच शैक्षणिक संस्था आणि कॉलेजसाठी वनस्पतीची रोपे मोफत दिली आहेत. या गार्डनमधील वनस्पतींना कोलकत्ता, लखनौसह देशभरातून मागणी आहे.
>
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

७० प्रजातील या ठिकाणी आहेत. पामच्या इतक्या प्रजाती एका ठिकाणी असलेल्या देशातील प्रमुख ४ बोटॅनिकल गार्डनपैकी एक शिवाजी विद्यापीठ आहे.

त्सुनामीनंतर अंदमान निकोबार परिसरातील वनस्पतींच्या दुर्मिळ प्रजाती आणून त्यांचे संवर्धनही याठिकाणी केले आहे. गार्डनमध्ये अँजिओस्पर्म १०४८, जिम्नोस्पर्म २२ आणि टेरिडोफायटा ६३ अशा एकूण ११३३ प्रजातींच्या वनस्पतींच्या आहेत.

पुढारी

# सायबर, डेटाबेस सुरक्षा काळाची गरज : डॉ. शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ई-मेल, फेसबुक, व्हॉटस् ॲप, ट्विटरवर, टेलीग्राम, डेटा बेस, ऑनलाईन बँकिंग, वेबसाईट, ब्लॉग, ऑनलाईन कार्यप्रणालीची सुरक्षा धोक्यात आली आहे. सायबर क्राईम व हॅकिंगच्या माध्यमातून फसवणुकीचे अनेक गैरप्रकार पुढे येत आहेत. त्यामुळे सायबर व डेटाबेस सुरक्षितता काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

पंडित मदमोहन मालवीय रिसर्च सेंटर व शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने 'सायबर सिक्युरिटी ॲन्ड डाटा सायन्सेस' या विषयावर विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित सात दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.



**कोल्हापूर : कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर प्रा. डॉ. आर. के. कामत, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. एस. आर. कट्टीमनी. (छाया : पप्पू अत्तार)**

डॉ. शिर्के म्हणाले, आजचे युग माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. बदलत्या काळात तंत्रज्ञानसुद्धा झपाट्याने बदलत आहे. ही सायबर सुरक्षा केवळ वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व लोकांना व विद्यार्थ्यांना उपयोगी आहे. ऑनलाईन असुरक्षिततेमुळे सामान्य माणूस वेठीस धरला जात आहे. त्यांच्या जनजागृतीसाठी असे फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमसारखे उपक्रम राबविणे गरजेचे आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्व्यक प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे महत्त्व सांगितले. अनिकेत बदामे, अमोल बागल यांनी मार्गदर्शन कले. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. समन्वयक डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी आभार मानले.

लोकमत

# सायबर, डेटाबेस सुरक्षितता गरजेची

## डी. टी. शिर्के : विवेकानंद महाविद्यालयामध्ये एफडीपी प्रोग्राम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : आजचे युग माहिती तंत्रज्ञानाचे आहे. बदलत्या काळात तंत्रज्ञानसुद्धा झपाट्याने बदलत आहे. सायबर क्राइम व हॅकिंगच्या माध्यमातून फसवणुकीचे अनेक गैरप्रकार पुढे येत आहेत; त्यामुळे सायबर व डेटाबेस सुरक्षितता काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथे केले.

पंडित मदमोहन मालवीय रिसर्च सेंटर व शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने 'सायबर सिक्यूरिटी अँड डाटा सायन्सेस' या विषयावर विवेकानंद महाविद्यालयामध्ये आयोजित सहा दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. डॉ. शिर्के म्हणाले, सायबर सुरक्षा केवळ वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या सर्व लोक, विद्यार्थ्यांना उपयोगी आहे. ऑनलाईन असुरक्षिततेमुळे सामान्य माणूस वेठीस धरला जात आहे. त्यांच्या जनजागृतीसाठी असे फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमसारखे उपक्रम राबविणे गरजेचे आहे.



विवेकानंद महाविद्यालयातील फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमच्या उद्घाटनप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी एस. वाय. होनगेकर, आर. के. कामत, आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमीकक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे महत्त्व सांगितले. त्यानंतर अनिकेत बदामे, अमोल बागल यांनी मार्गदर्शन केले. प्रा. समीक्षा फराकटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी आभार मानले.

### सुरक्षितता महत्त्वाची

या कार्यक्रमात डॉ. होनगेकर म्हणाले, आज ऑनलाईनच्या युगात मनुष्य रोजच्या जीवनात क्रेडिट कार्ड, डिबेट कार्ड, एटीएम कार्ड, ऑनलाईन बँकिंगच्या माध्यमातून लाखो रुपयांचे व्यवहार करत असतो; परंतु त्यासाठी कोणत्याही प्रकारची सुरक्षितता तो बाळगत नाही; त्यामुळे अनेक सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे; यासाठी सायबर व डेटाबेसची सुरक्षितता महत्त्वाची आहे.

# सायबर सुरक्षा काळाची गरज

## डॉ. डी. टी. शिर्के : विवेकानंद कॉलेजमध्ये एफडीपी प्रोग्रॅम



विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. डी. टी. शिर्के. सोबत मान्यवर.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आजचे युग माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. सायबर क्राइम व हॅकिंगच्या माध्यमातून फसवणुकीचे अनेक गैरप्रकार पुढे येत आहेत. त्यामुळे सायबर व डेटाबेस सुरक्षितता काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. पंडित मदमोहन मालवीय रिसर्च सेंटर व शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने सायबर सिक्युरिटी डाटा सायन्सेस या विषयावर विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित सहादिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

प्र. कुलगुरू शिर्के म्हणाले, बदलत्या काळात तंत्रज्ञानसुद्धा झपाट्याने बदलत आहे. ई-मेल, फेसबुक, आर्कुट, व्हॉटस अ‍ॅप, टविटर्‌वर, टेलीग्राम, डेटा बेस, ऑनलाइन बँकिंग, वेबसाइट, ब्लॉग, ऑनलाइन कार्यप्रणालीची सुरक्षा धोक्यात आली आहे. ही सायबर सुरक्षा केवळ वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व लोकांना व विद्यार्थ्यांना उपयोगी आहे. ऑनलाइन असुरक्षिततेमुळे सामान्य माणूस वेठीस धरला जात आहे. त्यांच्या जनजागृतीसाठी असे फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमसारखे उपक्रम राबवणे गरजेचे आहे. प्राचार्य डॉ. होनगेकर म्हणाले, आज ऑनलाइनच्या युगात मनुष्य रोजच्या जीवनात क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, एटीएम कार्ड, ऑनलाइन बँकिंगच्या माध्यमातून लाखो रुपयांचे व्यवहार करत असतो; परंतु यासाठी कोणत्याही प्रकारची सुरक्षितता तो बाळगत नाही. त्यामुळे सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. यासाठी सायबर व डेटा बेसची सुरक्षितता महत्त्वाची आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत गुणवत्ता हमीकक्षाचे समन्व्यक डॉ. आर. के. कामत यांनी या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे महत्त्व सांगितले. या प्रोग्रामसाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून अनिकेत बदामे, अमोल बागल लाभले. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. आभार विवेकानंद कॉलेजच्या समन्वयक डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी मानले. या कार्यशाळेसाठी शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राध्यापक व विवेकानंद महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका उपस्थित होत्या.



कोल्हापूर : वृक्षारोपण मोहिमेस प्रारंभ करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# विद्यापीठात वृक्ष लागवड मोहिमेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड मोहिमेसंदर्भातील आवाहनाला प्रतिसाद देत शिवाजी विद्यापीठाच्या वतीने परिसरात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वृक्षारोपण मोहिमेस प्रारंभ झाला. मोहिमेंतर्गत विद्यापीठात ४०० रोपे लावण्यात येणार आहेत.

सोमवारी सकाळी आठ वाजता विद्यापीठाच्या मेघनाद नागेशकर क्रीडा संकुल परिसरात कडुलिंब रोप लागवड मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधीक्षक ए. के. जाधव आदींनी मोहिमेत सहभाग घेतला.



कोल्हापूर : वसंतराव नाईक जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.

# वसंतराव नाईक यांना अभिवादन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या कार्यक्रमात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी पंडित नेहरू अध्यासनाचे प्रमुख डॉ. रवींद्र भणगे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.

लोकमत

# जीएसटीमुळे समाजाचा विकास

## अण्णासाहेब गुरव : वस्तू व सेवा कर दिन उत्साहात साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वस्तू व सेवा करामुळे व्यापारी, उद्योजकांमध्ये सकारात्मक लहर निर्माण व्हायला लागली आहे. ही लहर समाजाच्या विकासासाठी निश्चितपणे उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य विभागप्रमुख डॉ. अण्णासाहेब गुरव यांनी व्यक्त केली.

वस्तू व सेवा कर विभागातर्फे सोमवारी वस्तू व सेवा कर दिन साजरा केला. यावेळी ते बोलत होते. केंद्रीय वस्तू व सेवा कर उपायुक्त धनंजय कदम, राज्य कर सहआयुक्त रेश्मा घाणेकर, उपायुक्त वैशाली काशीद उपस्थित होते.

डॉ. गुरव म्हणाले, जीएसटीमुळे भविष्यात काही वस्तूंच्या किमती कमी होतील. त्याचबरोबर जीडीपीमध्ये निश्चित वाढ होणार आहे.

अध्यक्षीय भाषणात सहआयुक्त घाणेकर म्हणाल्या,



**वस्तू, सेवा कर दिनानिमित्त सोमवारी आयोजित कार्यक्रमात अण्णासाहेब गुरव यांनी मार्गदर्शन केले.**

जीएसटीमुळे सुसंगत, नियोजनबद्ध काम सुरू आहे. अजूनही व्यापाऱ्यांचे काही प्रश्न निर्माण होत आहेत ते सोडविण्यात येतील. उपायुक्त वैशाली काशीद यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सहायक आयुक्त स्वाती पाटील यांनी आभार मानले. यावेळी महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष ललित गांधी, कोल्हापूर जिल्हा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, कोल्हापूर हॉटेलमालक संघटनेचे अध्यक्ष उज्ज्वल नागेशकर, कागल पंचतारांकित एमआयडीसी उद्योजक संघटनेचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, किराणा भुसारी संघटनेचे अध्यक्ष प्रदीप कापडिया, चार्टर्ड अकाउंटंट असोसिएशनचे चेतन ओसवाल, कोल्हापूर हॉटेलमालक संघटनेचे सेक्रेटरी सिद्धार्थ लाटकर, इंजिनिअरिंग असोसिएशनचे सचिव प्रदीप व्हरांबळे, शिरोली मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे अध्यक्ष राजू पाटील, सर्व अधिकारी, कर्मचारी, निवृत्त अधिकारी, विविध व्यापारी, सी.ए.संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### सर्वप्रथम फ्रान्समध्ये

वस्तू व सेवा कर १९५४ मध्ये सर्वप्रथम फ्रान्समध्ये सुरु झाला. सध्या १६० देशांत एक करप्रणाली लागू झाली आहे. व्यावसायिकांच्या मनाची मशागत करून त्यांच्या नफ्यातील हिस्सा आपल्याकडे कर स्वरुपात घेणे म्हणजे जीएसटी होय, असे गुरव यांनी सांगितले.

पुढारी

# ‘जीएसटी’चा विकासात मोलाचा वाटा

## डॉ. अण्णासाहेब गुरव : वस्तू आणि सेवा कर विभागातर्फे कार्यक्रम




**कोल्हापूर : जीएसटी दिनानिमित्त वस्तू व सेवा कर विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. अण्णासाहेब गुरव. सोबत वैशाली काशीद, धनंजय कदम, श्रीमती रेश्मा घाणेकर आदी.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

‘एक देश एक कर’ याअंतर्गत असणाऱ्या जीएसटी करप्रणालीचा देश विकासात मोलाचा वाटा आहे. लवकरच या करामुळे वस्तू व सेवांचे दर कमी होतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ कॉमर्स विभागाचे प्रमुख डॉ. अण्णासाहेब गुरव यांनी केले.

वस्तू व सेवा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य कर विभागाच्या सहआयुक्त रेश्मा घाणेकर होत्या.

गुरव म्हणाले, १६ कर एकत्र करून आपल्या देशात जीएसटी लागू करण्यात आला. जगातील दीडशेहून अधिक देशांत जीएसटी लागू झाला आहे; पण ज्यांनी हा कर लागू केला. त्या देशात पुन्हा त्या राजकीय पक्षांची सत्ता आलेली नाही. भारत त्याला अपवाद आहे. कारण, जीएसटी करात असणारी सुलभता, व्यापारी व उद्योजकांमध्ये कर देण्याबाबत निर्माण झालेला विश्वास यामुळे कर वसुली चांगल्या पद्धतीने होत आहे. सध्या या कराची रचना चांगल्या पद्धतीने करण्याचे काम अजूनही सुरूच आहे. सुधारणांच्या अनुषंगाने विचार केला, तर कराचा परताव्यामध्ये गतिमानता येणे गरजेचे आहे. लहान व्यावसायिकांसाठी करात सुलभता आणणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय भाषणात सहआयुक्त श्रीमती घाणेकर म्हणाल्या, परताव्याबाबत व्यापाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी कटिबद्ध आहे. करासंदर्भात काही अडचणी असल्यास मेलवरून संपर्क करावा. त्या सोडविण्यासाठी पाठपुरावा केला जाईल. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष ललित गांधी, कोल्हापूर चेंबर्सचे अध्यक्ष संजय शेटे, हरिश्चंद्र धोत्रे, राजू पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. राज्य कर उपायुक्त वैशाली काशीद यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन बजरंग मोरे यांनी केले. आभार सहायक आयुक्त स्वाती पाटील यांनी मानले.

# समाजाच्या विकासासाठी जीएसटी उपयुक्त

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'वस्तू व सेवा करामुळे व्यापारी आणि उद्योजकांच्यामध्ये सकारात्मकता निर्माण होत आहे. ही सकारात्मकता समाजाच्या विकासासाठी निश्चितपणे उपयुक्त ठरेल', अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य विभागप्रमुख डॉ. अण्णासाहेब गुरव यांनी व्यक्त केली.

## डॉ. अण्णासाहेब गुरव यांचे प्रतिपादन

वस्तू व सेवा कर विभागाच्यावतीने सोमवारी वस्तू व सेवा कर दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय वस्तू व सेवा कर उपायुक्त धनंजय कदम, राज्य कर सहआयुक्त रेश्मा घाणेकर, उपायुक्त वैशाली काशीद उपस्थित होत्या.

डॉ. गुरव म्हणाले, 'वस्तू व सेवा कर १९५४ मध्ये सर्वप्रथम फ्रान्समध्ये सुरु झाला. सध्या १६० देशांत एक कर प्रणाली लागू झाली आहे. व्यावसायिकांच्या नफ्यातील हिस्सा कर स्वरुपात घेणे म्हणजे जी.एस.टी. होय.




वस्तू व सेवा कर दिन कार्यक्रमात बोलताना डॉ. अण्णासाहेब गुरव. डावीकडून जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते, राज्य कर सह आयुक्त रेश्मा घाणेकर, केंद्रीय वस्तू व सेवा कर उपायुक्त धनंजय कदम, उपायुक्त वैशाली काशीद

उत्पादक,व्यावसायिक, ग्राहकांच्याकडील पैसे एका करामार्फत सरकारकडे कसे येतील आणि त्यातून देशाचा विकास करता येईल या भावनेतून जी.एस.टी. सुरु झाला. सध्या एक कर प्रणालीमध्ये मनुष्य संसाधन, वस्तू व साहित्य, बाजारपेठा या सर्व घटकांचा चांगल्या प्रकारे वापर करण्यासाठी जी.एस.टी.ची अंमलबजावणी सुरु झाली आहे.'

अध्यक्षीय भाषणात सहाय्यक आयुक्त घाणेकर म्हणाल्या, 'परताव्याबाबत व्यापाऱ्यांची समस्या सोडविण्यासाठी कार्यालय कटीबद्ध आहे. काही अडचणी असल्यास मेलवरुन आमच्याकडे संपर्क करावा. त्या सोडविण्यासाठी निश्चितपणे पाठपुरावा केला जाईल.'

यावेळी महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष ललित गांधी, जिल्हा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, कोल्हापूर हॉटेल मालक संघटनेचे अध्यक्ष उज्वल नागेशकर, सचिव सिध्दार्थ लाटकर, कागल पंचतारांकित एमआयडीसी उद्योजक संघटनेचे अध्यक्ष हरिशचंद्र धोत्रे, किराणा भुसारी संघटनेचे अध्यक्ष प्रदीप कापडिया, चार्टड अकांऊटंट असोसिएशनचे चेतन ओसवाल, इंजिनिअरींग असोसिएशनचे सचिव प्रदीप व्हरांबळे, शिरोली मॅन्युफॅक्चरींग असोसिएशनचे अध्यक्ष राजू पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. उपायुक्त वैशाली काशीद यांनी प्रस्ताविक केले. सहाय्यक आयुक्त स्वाती पाटील यांनी आभार मानले.

### सर्व एक आहोत

डॉ. गुरव म्हणाले, 'जी.एस.टी. मुळे भविष्यात काही वस्तूंच्या किंमती कमी होतील. तसेच जी.डी.पी मध्ये निश्चित वाढ होणार आहे. करदाते प्रामाणिकपणे कर भरतात म्हणून आपण यशस्वी होतो. समाजाच्या विकासासाठी कर भरणारे आपण सर्व एक आहोत ही भावना सर्वांची हवी.'

# वस्तू व सेवा करामुळे समाजाचा विकास : डॉ. अण्णासाहेब गुरव

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

वस्तू व सेवा करामुळे व्यापारी आणि उद्योजकांमध्ये सकारात्मक लहर निर्माण व्हायला लागली आहे. ही लहर समाजाच्या विकासासाठी निश्चितपणे उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा डॉ. अण्णासाहेब गुरव यांनी व्यक्त केली.

वस्तू व सेवा कर विभागाच्या वतीने सोमवारी वस्तू व सेवा कर दिन साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. केंद्रीय वस्तू व सेवा कर उपायुक्त धनंजय कदम, राज्य कर सहआयुक्त रेश्मा घाणेकर, उपायुक्त वैशाली काशीद उपस्थित होते.

डॉ. गुरव म्हणाले, वस्तू व सेवा कर १९५४ मध्ये सर्वप्रथम फ्रान्समध्ये सुरू झाला. सध्या १६० देशांत एक करप्रणाली लागू झाली आहे. व्यावसायिकाच्या मनाची मशागत




कोल्हापूर : वस्तू व सेवा कर विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. अण्णासाहेब गुरव. सोबत अन्य मान्यवर.

करून त्याच्या नफ्यातील हिस्सा आपल्याकडे कर स्वरूपात घेणे म्हणजे जीएसटी होय. उत्पादक, व्यावसायिक, ग्राहकांकडील पैसे एका करामार्फत शासनाकडे कसे येतील आणि त्यातून देशाचा विकास करता येईल, या भावनेतून जीएसटी सुरू झाला.

विविध करप्रणालीमध्ये विविध संसाधनांचा वापर होत होता. सध्या एकच करप्रणालीमध्ये मनुष्य संसाधन, मटेरियल, मार्केट या सर्व घटकांचा चांगल्या प्रकारे वापर करण्यासाठी जीएसटी अंमलबजावणी सुरू झाली आहे. जीएसटीमुळे भविष्यात काही वस्तूंच्या किमती कमी होतील, त्याचबरोबर जीडीपीमध्ये निश्चित वाढ होणार आहे, असे सांगून डॉ. गुरव म्हणाले, करदाते प्रामाणिकपणे कर भरतात म्हणून आपण यशस्वी होतो.

सहआयुक्त घाणेकर म्हणाल्या, परताव्याबाबतचे व्यापाऱ्यांची समस्या सोडविण्यासाठी मी कटिबद्ध आहे. काही अडचणी असल्यास मेलवरून आमच्याकडे संपर्क करा. त्या सोडविण्यासाठी निश्चितपणे पाठपुरावा केला जाईल. जीएसटीमुळे सुसंगत नियोजनबद्ध काम सुरू आहे. अजूनही व्यापाऱ्यांचे काही प्रश्न निर्माण होत आहेत ते सोडविण्यात येतील. तंत्रज्ञान आपले आयुष्य सुलभ करते ते आपण स्वीकारले पाहिजे, असे सांगितले.

उपायुक्त कदम, महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष ललित गांधी, कोल्हापूर जिल्हा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, कोल्हापूर हॉटेल मालक संघटना अध्यक्ष उज्ज्वल नागेशकर, कागल पंचतारांकित एमआयडीसी उद्योजक संघटनेचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, किराणा भुसारी संघटनेचे अध्यक्ष प्रदीप कापडिया, चेतन ओसवाल, सिद्धार्थ लाटकर, प्रदीप व्हरांबळे, राजू पाटील आदींनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

यावेळी केंद्रीय वस्तू व सेवा कर उपायुक्त धनंजय कदम, राज्य कर सहआयुक्त रेश्मा घाणेकर, उपायुक्त वैशाली काशीद उपस्थित होते. सहायक आयुक्त स्वाती पाटील यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठात विदेशी भाषा अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० यासाठी शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या रशियन, जर्मन, जपानी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेश अर्ज भरण्याची दि. १० जुलै मुदत आहे. यासाठी बारावी उत्तीर्ण किंवा समकक्ष अशी प्रवेश अर्हता आहे. अधिक माहितीसाठी विदेशी भाषा विभाग, भाषा भवन येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

# शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुखपदी डॉ. रणधीर शिंदे



रणधीर शिंदे

इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुखपदी डॉ. रणधीर शिंदे यांची नियुक्ती झाली. यापूर्वी त्यांनी कुंडलच्या जी. डी. लाड कॉलेजमध्ये सहायक प्राध्यापक म्हणून काम केले आहे. शिवाजी विद्यापीठात सुरवातीला सहायक प्राध्यापक, त्यानंतर सहयोगी प्राध्यापक, त्यानंतर प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांचे ललित लेखन प्रसिद्ध आहे. त्यांचे अनेक ग्रंथ, संपादित पुस्तके आहेत. अनेक महत्त्वाचे संशोधन प्रकल्प प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या विपुल लेखनाची दखल घेत त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त झाले आहेत.